**स. क्रि. केस नं. २०५/२०२२**

**निशाणी – १३ लगत**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक – ०२ मी शपथपूर्वक सांगतो कि –</u>**

**माझे नाव –** अजय सुभाष धोत्रे

**वय** – २८, **व्यवसाय**– पोलीस कॉ., ब.नं.२४६४

**राहणार**–चिंचणी वांगी पोलीस ठाणे

**<u>सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकिल श्री. अमित सगरे यांचेमार्फत साक्षीदारचा सरतपास शपथेवर –</u>**

१. दिनांक २०/०४/२०२२ रोजी मी चिंचणी वांगी पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो. त्या दिवशी गोपनीय बातमी मिळाली की,सोनकिरे येथे चॉदसाब आत्तार देशी दारुची विक्री करीत होते. आम्ही खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो. तेथे एक इसम दारुची विक्री करीत असलेला दिसला. त्याच्याकडे देशी दारु च्या असलेल्या १५ सिलबंद बाटल्या मिळाल्या. नमुन्याकरीता दोन बाटल्या सिलबंद करुन घेतल्या. मी फिर्याद दिली. मला आता फिर्याद दाखविली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. फिर्यादीस **<u>निशाणी २२</u>** देण्यात येते. आरोपी आज कोर्टात हजर नाही . मी त्याला पाहिल्यास ओळखू शकतो.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपी तर्फे वकिल श्री.सी.एम.यादव यांचेतर्फे उलटतपास शपथेवर –</u>**

२. मला घटनास्थळाच्या चतुसीमा सांगता येतील. हे खरे की, या कामातील पंच आमचे नेहमीचे पंच आहेत. हे खरे की,आमचा कोटा पूर्ण करणेकरिता आम्ही केसेस दाखल

करतो.  हे खरे नाही की, सरतपासात कथन केलेला मजकूर खोटा कथन केला आहे. हे खरे नाही की, आज मी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. २६.०३.२४ न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव